22914

मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन सहावा माळा,
नवी मुंबई ४०० ६१४
दिनांक :- 2004

**कार्यालयीन आदेश क्रमांक** 284 **दिनांक** 22/6/2004

विषय :- नगरपरिषदा नगरपालिका शिक्षण मंडळ /संकिर्ण लेखापरीक्षणाबाबत.

नगरपरिषद / नगरपालिका शिक्षण मंडळ/ संकिर्ण लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

१) नगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ आणि संकिर्ण संस्थाचे लेखापरीक्षण माहे मे २००४ अखेर पूर्ण करावे आणि लेखापरीक्षण अहवाल विहीत वेळेत निर्गमित करावेत त्यानंतर माहे जुलै पासुन पंचायत समित्या व जिल्हा परिषदांचे लेखा परीक्षण पूर्ण करुन त्यांचे अहवाल माहे डिसेंबर पर्यंत निर्गमित करण्यात यावेत.

२) संकिर्ण संस्थाचे लेखापरीक्षण हाती घेताना शक्यतो ज्या संस्थाचे लेखापरीक्षण शुल्क आकारणीच्या अटीवर घेण्यात येते अशा संस्थांचे लेखापरीक्षण प्रथम हाती घेण्यात यावे. आणि अशा संस्थांचे लेखापरीक्षण थकित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. कृषि विद्यापीठांचे मागील वर्षाचे वार्षिक लेखे १५ जुलै पर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे तथापि प्रत्यक्षात तसे होत नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे या प्रकरणी या कार्यालयाचे पत्र क्र.स्था १८/ब/उ.प्र.प/अे.अे.४/२६६८/ दिनांक १७.१२.२००३ अन्वये तपशिलवार सुचना देण्यात आल्या आहेत त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

३) सर्व उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) यांनी त्यांच्या विभागांतील संस्थाचे लेखापरीक्षण निश्चित केलेल्या वेळेत पूर्ण होण्यासाठी आणि लेखापरीक्षण अहवाल विहीत वेळेत निर्गमित होण्यासाठी पाठपुरावा करावा.

४) प्रत्येक वर्षाचा लेखापरीक्षणाचा कालबध्द कार्यक्रम आखून त्याप्रमाणे नियोजीत कार्यक्रमाप्रमाणे विहित कालावधीत लेखापरीक्षण केले जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

५) नियोजीत मंजूर कार्यक्रमाप्रमाणे लेखापरीक्षण न केल्यास अथवा केलेल्या लेखापरीक्षणाचा अहवाल विहीत मुदतीत (३ महिन्याच्या आत) निर्गमित न केल्यास त्याबाबत संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

मुख्य लेखापरीक्षक
स्थानिक निधी लेखा
महाराष्ट्र राज्य.

प्रत :-

१) मा. संचालक, लेखा व कोषागारे , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर
२) उपमुख्य लेखापरीक्षक(वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, (----------------)
३) उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा कार्यालये (--------------)
४) AA अहवाल शाखा

B.Micrsoft word,AA ३,२१०६०४